# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १६.०५.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १५.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १३ केसेसमध्ये १९ ईसमांवर कारवाई करून २९,१३,८२५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करून ९८५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१३७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२८,२५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचे ०५ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०९.०५.२०२६ चे १३.४० वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत सुरेंद्रगढ, व्हेटरनरी कॉलेजमागे, सापरा सुपरबाजार समोर नागपूर येथे फिर्यादी राजकुमार रामराज यादव वय ५० वर्षे रा. गांधी पुतळयाजवळ, सुरेंद्रगढ, नागपुर यांनी त्यांची होन्डा स्प्लेंडर गाडी क्र. एमएच ३१ एफडी ७७६१ किंमती ५०,०००/—रू. ची ही लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचे एका अल्पवयीन साथीदारासोबत केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकांचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन जप्त करुन त्यांना अधिक विचारपुस केली असता त्यांनी वर नमुद वाहन चोरी व्यतिरिक्त पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतून इतर ०२ वाहन चोरीचे गुन्हे तसेच पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतून ०१ वाहन व अंबाझरी हद्दीतून ०१ वाहन असे एकूण ०५ वाहन चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यांचे ताब्यातून गुन्हयात चोरी केलेले ०५ दुचाकी वाहने एकूण किंमती २,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकांना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा)

यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि नितीन चुलपार, सफौ. दीपक रिठे, पोहवा शंभूसिंग किरार, सचिन बढीये, पंकज हेडाऊन, नितीन वर्मा, अजय शुक्ला, पोअं. राहुल पुसरामे, विवेक कावडकर व अभय ढोणे यांनी केली.




**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०५ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक**

दिनांक १०.०५.२०२६ चे १३.०० वा. ते १४.१० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत मेन कॉलनी, जुना कामठी रोड, कळमणा नागपूर येथे राहणारे फिर्यादी मोहम्मद साजिद मोहम्मद यासिल वय ३२ वर्षे यांनी त्यांची बर्गमेन दुचाकी गाडी क्र. एमएच ३६ एक्यु ७८४४ किंमती ७०,०००/—रू. ची त्यांचे राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०५ चे अधिकारी व अंमलदार हे गस्त करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून पोलीस ठाणे कळमणा हद्यीत एका बर्गमॅन गाडीवरील इसमास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने आपले नाव आदर्श सुरेश यादव वय १९ वर्षे, रा. रानी दुर्गावती चौक, यशोधरानगर, नागपूर असे सांगितले. त्यास वाहनाबाबत विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस गुन्हयात अटक करून त्यांचे ताब्यातुन चोरी केलेले बर्गमॅन वाहन किंमती ७०,०००/—रू. चे जप्त करण्यात आले. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी कळमणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. श्री विनायक गोल्हे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**४) गुन्हेशाखा युनिट ५ पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ०९.०५.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, फिर्यादी अथर्व गौरीशंकर म्हस्के वय २१ वर्षे रा. प्लॉट. १०५, सर्जा टाऊन मागे, वैष्णोदेवी नगर, भांडेवाडी, नागपुर हे त्यांचे ओला इलेक्ट्रीक गाडी क्रमांक एमएच ४९ सीएच ३९६० ने रॅपीडो बुकींगचे कामाकरीता पोलीस ठाणे पारडी हद्दीत उमिया धाम

मंदीरजवळील नाल्याजवळून जात असता, घटनास्थळी उभ्या असलेल्या तीन अनोळखी मुलांनी त्यांना थांबवून यहा क्या कर रहा असे म्हणून हातबुक्कीने मारहाण करुन तेरे पास के पैसे निकाल असे म्हणून फिर्यादीचे खिशातील ०२ मोबाईल फोन व रोख ४,०००/— रू. असा एकूण १८,०००/— रु. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(६),३५१(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून आरोपींना निष्पन्न करून, सापळा रचुन आरोपी नामे १) रोहीत रतिराम रहांगडाले वय २१ वर्षे २) समीर उमाजी लांबट वय १९ वर्षे दोन्ही रा. शिवछत्रपती नगर, वाठोडा ले आऊट, खरबी, नागपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर प्लस गाडी व सुझुकी ॲक्सेस गाडी, ०२ मोबाईल फोन व रोख ५००/—रू. असा एकुण १,३०,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन), मा.श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्री विनायक गोल्हे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) तहसिल पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १५.०५.२०२६ चे १९.५० वा. चे सुमारास, तहसिल पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, शिवाजी नाईट स्कुलमागे, हंसापुरी खदान येथे गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन मुस्तकीम कुरैशी मुश्ताक अहमद कुरेशी वय ३२ वर्षे याचे घरी पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे ०६ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपणे व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता बांधून ठेवलेले मिळुन आले. आरोपी याने गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ०६ गोवंशीय जनावरे एकुण किंमती अंदाजे ९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. सुरज सिरसाठ यांनी आरोपीविरूध्द कलम ५,५(क),९,९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)ड,च,ज,झ प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे प्रतापनगर :— उघडया दारातुन चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०५.२०२६ चे १६.०० वा. ते १९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, सुभाषनगर, कामगार कॉलनी, प्रज्ञाशिल बुध्द विहारजवळ राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती रत्नमाला धर्मदास मेश्राम वय ६० वर्षे हया त्यांचे घराचे दार लोटून मुलीला डॉक्टर पडोळे हॉस्पिटल येथे उपचाराकरीता घेऊन गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे उघडे दारातुन आंत प्रवेश करून, तेथे ठेवलेल्या चाबीने लोखंडी आलमारी उघडून त्यातील रोख १,०५,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,४५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे पोउपनि. साईनाथ काकरवाल ९७६६४९६३६३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे इमामवाडा :—** दिनांक १५.०५.२०२६ चे १०.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत सरदार वल्लभभाई पटेल चौक, इमामवाडा, नागपुर येथील सचिन वसंतराव गुडधे यांचे बांधकाम साईटवर हातमजुरीचे काम करणा—या श्रीमती सुषमा मनोज नेवारे हया बांधकाम साईटला सुटी असल्याने त्यांची मुलगी कु. राशी वय ०६ वर्षे हिचेसह दुसरे माळयावरील स्लॅबवर झोपलेल्या होत्या. स्लॅबला पॅराफीट वॉल नसल्याने दोरी बांधून ठेवली होती. फिर्यादीची मुलगी झोपेतून उठून खेळता खेळता दोरीवर गेल्याने दोरी तुटून तिचा तोल जाऊन ती खाली पडल्याने डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाली. तिला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान १४.१५ वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे मपोउपनि. स्वाती माळी ८६००५१८४७३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** सौ. दिशा आशिष टेंभुर्णे वय ३० वर्षे रा. प्लॉट नं. २६, आदर्श नगर, ठवरे कॉलोनी, नंदनवन, नागपूर ह्या त्यांचे मुलगी कु. आरोही आशिष टेंभुर्णे वय ९ वर्ष हिचेसह दिनांक १३.०५.२०२६ रोजी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन सौ दिशा** रंग— गोरा, चेहरा—गोल, बांधा— सडपातळ, केस— काळे लांब, अंगात— निळ्या रंगाचा कुर्ता व पांढरा पायजामा घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. **वर्णन कु.आरोही** रंग— गोरा, चेहरा—गोल, बांधा— मजबुत, केस— काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाचा पांढरा फुलांचा टीशर्ट व हॉफ लगीन घातलेली आहे. भाषा— मराठी बोलते.





सौ दिशा कु.आरोही

स्वा/—

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**